अस्सल सोलापुरी

# सुराज्य सोलापूर

www.surajyadigital.com | शनिवार, दि. २१ जून २०२५ |


## चंद्रभागा नदीत बुडून बेळगावच्या तरूणाचा मृत्यू

✔ पंढरपूर/प्रतिनिधी

आषाढी यात्रेचा सोहळा अवघ्या पंधरा दिवसांवर येऊन ठेपला आहे. उजनी धरणाच्या पाणी पातळीत झपाट्याने वाढ होत असल्याने आषाढी यात्रेवर महापुराचे सावट आहे. प्रशासकिय यंत्रणा सज्ज असतानाच शुक्रवारी सकाळी सातच्या दरम्यान चंद्रभागा नदीत भक्त पुंडलिक मंदिराजवळ बेळगाव येथील शुभम पावले (वय २७) या तरुण भाविकाचा बुडून मृत्यू झाला आहे.

मित्रांसोबत तो पंढरपूर येथे पांडुरंगाच्या दर्शनासाठी आला होता. सकाळी नदीमध्ये आंघोळीला गेल्यानंतर पाण्याचा अंदाज न आल्याने तो बुडाला. तब्बल चार तासांच्या शोध कार्यानंतर त्याचा मृतदेह आढळून आला. तो बुडाल्याची खबर मित्रांनाही नव्हती. बराच वेळ तो दिसला नाही. तेव्हा मित्रांनी त्याचा शोध घ्यायला सुरूवात केली. शुभम पाण्यात बुडाल्याचा संशय त्यांना आला. त्यानंतर नावाड्यांनी पाण्यात उतरून त्याचा शोध घेतला.नऊच्या सुमारास त्याचा मृतदेह हाती



शुभम पावले

लागला.पोलिसांनी घटनास्थळी येवून पंचनामा केला. दरम्यान मित्रांनी हा दुर्दैवी प्रसंग बेळगावमधील शुभमच्या कुटुंबियांना कळवली. त्यानंतर सारे कुटुंब दुपारी पंढरीत दाखल झाले. शवविच्छेदन झाल्यानंतर त्याचा मृतदेह घेवून ते व मित्र बेळगावला गेले. चंद्रभागा सध्या तुडूंब भरून वाहात आहे. आषाढी यात्रेच्या तोंडावर चंद्रभागा नदीमध्ये पवित्र स्नानासाठी भाविकांची गर्दी होत आहे.

## पोलिसांनी ‘खाक्या’ दाखविताच चौघे प्रेमी युगल बोलू लागले मिठू-मिठू

# ‘अश्विनी’ अन् ‘रोहित’च्या आत्महत्येचे अखेर गूढ उकलले; सहा मित्र-मैत्रिणींच्या वर्तुळाचा ‘सुसाईड’ प्रकरणाशी जांगडगुत्ता!

✔ सोलापूर/खास प्रतिनिधी

एकाच खोलीत, एकाच सिलिंग फॅनला अन् एकाच ओढणीने गळफास घेऊन आत्महत्या करण्याची खळबळजनक घटना काल गुरुवार (ता.१९) दुपारी चार वाजण्याच्या सुमारास सोलापुरातील पूर्व भागाच्या कर्णिक नगर परिसरात उघडकीस आली होती. या घटनेने अक्षरश: सोलापूर शहर हादरुन गेलं होतं. आत्महत्या करण्यापूर्वी लिहून ठेवलेल्या चिठ्ठीमधून बहिण-भावाचं नातं सांगणाऱ्या मृत अश्विनी केशापुरे आणि रोहित ठणकेदार या दोघांनी एकत्रित आत्महत्या का केली असावी? असा प्रश्न तमाम सोलापूरकांना पडला होता. या घटनेने पोलिसदेखील चक्रावले होते. मात्र सुसाईड नोटच्या आधारे एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. गुरुवार सायंकाळपासून वेगवेगळ्या अँगलने तपास करीत अखेर शुक्रवारी सायंकाळपर्यत पोलिस या दोघांच्या आत्महत्येच्या कारणांच्या मुळापर्यंत सकृतदर्शनी पोचले. अश्विनी आणि रोहित या दोघांच्या आत्महत्येच्या कारणांची प्राथमिक माहिती तपासातून पोलिसांच्या हाती आली आहे. या माहितीमधून ‘अश्विनी’ अन् ‘रोहित’च्या आत्महत्येचे अखेर गूढ उकलले आहे. सहा मित्र-मैत्रिणींच्या वर्तुळाचा त्या दोघांच्या आत्महत्येशी जांगडगुत्ता असल्याची माहिती पोलिस तपासामधून समोर आली आहे.



मृत अश्विनी | मृत रोहित

- अर्ध्यावरच मैत्री तुटल्यातून आलेले डिप्रेशन अन् बदनामीच्या आलेल्या आक्षेपातून ‘अश्विनी’ची आत्महत्या
- खरेखुरे आई-वडिल नसल्याच्या नैराश्यातून ‘रोहित’ने स्वत:ला संपविण्याचे उचलले टोकाचे पाऊल
- दोघेही बहिण-भाऊ समदु:खी आहोत, जगात राहून काय करायचे, या भावनेतून दोघांनी एकत्रित आत्महत्या केल्याची प्राथमिक माहिती
- मृत अश्विनीने लिहून ठेवलेल्या चिठ्ठीमुळे आत्महत्येच्या कारणांपर्यंत पोलिसांना पोचणे झालं शक्य
- चिठ्ठीमधील नावांवरुन पोलिसांनी चौघांना ताब्यात घेऊन सुरु ठेवला घटनेचा तपास

दरम्यान अर्ध्यावरच प्रेम प्रकरण ब्रेकअप् होण्यातून आलेले डिप्रेशन अन् प्रियकराने दुसरी गर्लफ्रेंड पटवली. तिची बदनामी केल्याचा आलेला आक्षेप यातून ‘अश्विनी’ हिने आत्महत्या करण्याचे टोकाचे पाऊल उचलल्याच्या माहितीपर्यंत पोलिस सकृतदर्शनी पोचले आहेत. तर दुसरीकडे मृत रोहित हा विकृत स्वभावाचा होता. त्याला खरेखुरे आई-वडिल नव्हते. खरेखुरे आई-वडिल नसण्यावरुन मित्र-मैत्रिणींसह लोक बोलायचे. आई-वडिल नसल्याचा विरह त्याला सहन होत नव्हता. त्यामधून तो नैराश्येच्या गर्तेत गेला होता. त्यातूनच त्याने आत्महत्या केली, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी चौकशीतून बांधला आहे.

विशेष करुन एकमेकांना बहिण-भाऊ मानणारे अश्विनी आणि रोहित हे दोघेही नैराश्येच्या गर्तेत होते, आपण दोघेही समदु:खी आहोत, अशी त्यांची भावना झाली असावी आणि त्यातून दोघांनी एकत्रितरित्या एकाच वेळी आत्महत्या केली असावी, या प्राथमिक निष्कर्षापर्यंत पोलिस पोचले आहेत. मृत अश्विनी हिचा पहिला मित्र प्रमोद (बदलेले नाव) याच्यासोबत असलेले प्रेम प्रकरण ब्रेकअप् झाले होते. प्रमोद याने ते ब्रेकअप् केलेले होते. अश्विनी सोबतच्या प्रेम प्रकरणाला कायमचा पूर्ण विराम दिल्यानंतर प्रमोद याने हिना (बदललेले नाव) नावाची दुसरी गर्लफ्रेंड पटवली होती. प्रमोद हा तिच्या प्रेमात आकंठ बुडालेला होता. या टप्प्यावर मृत अश्विनी ही त्याला वारंवार सांगत होती की तु पटवलेली दुसरी गर्लफ्रेंड हिना ही चांगली नाही. हिना चांगली नाही, अशी बदनामी हिने केल्याचा आक्षेप मृत अश्विनीवर आला होता. यादरम्यान अश्विनी हिचा पहिला प्रियकर प्रमोद आणि हिना हे दोघे बदनामी करत असल्याच्या कारणावरुन संतापून होते.

तसेच दोन नंबरचा विनोद (बदललेले नाव) आणि त्याची गर्लफ्रेंड विनया (बदललेले नाव) यांनादेखील हिना चांगली नसल्याबद्दल मृत अश्विनी हिनेच सांगितले होते. या दोघांमध्येदेखील मृत अश्विनी हिनेच हिनाबद्दल बदनामी केली असा आक्षेप एक नंबरचा मित्र प्रमोद आणि त्याची मैत्रिण हिना या दोघांचा होता. बदनामीच्या प्रकरणातून वाददेखील झाले होते. खास करुन मृत अश्विनी ही ‘प्रमोद यास हिनाला सोडून दे, ती चांगली नाही. मी तुला सर्वस्वं दिलं तरी तु माझ्यासोबतचे प्रेमसंबंध तोडले, असे वारंवार म्हणत होती. मृत अश्विनी आणि रोहित या दोघांच्या आत्महत्येच्या प्रकरणाला अनेक कंगोरे आहेत, त्यांच्या आत्महत्येनंतर प्रमोद, हिना तसेच विनोद आणि विनया यांच्याकडे चौकशी सुरु आहे. त्यातून अधिक माहिती समोर येऊ शकते. एमआयडीसी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक प्रमोद वाघमारे यांच्यासह त्यांच्या टिमने अश्विनी आणि रोहित यांच्या आत्महत्येच्या पार्श्वभूमीवर, तपासाची वेगाने सुत्रं फिरवली. अधिक तपासामधून ते आत्महत्येच्या मूळ निष्कर्षापर्यंत ते पोचतील. पोलिस निरीक्षक प्रमोद वाघमारे यांनी या प्रकरणाच्या अनुषंगाने, माहिती दिली.

### ...तर दोषींवर होणार गुन्हे दाखल

अश्विनी आणि रोहित यांच्या आत्महत्येनंतर त्यांच्या चौघा मित्र-मैत्रिणींना ताब्यात घेतलं आहे. त्यांचे जबाब सुरु आहेत. जबाबातून समोर आलेलं सत्य आणि मृत दोघांचे आई-वडिल यांची भूमिका यावरुन दोषींवर या प्रकरणात गुन्हे दाखल होऊ शकतात, असं एमआयडीसी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक प्रमोद वाघमारे यांनी सांगितले.

### मृत रोहित होता खोटारडा, खोटेनाटे सांगून मालकाकडून उचलायचा पैसे

आत्महत्या केलेला रोहित हा तरुण खोटारडा असल्याची माहिती समोर येत आहे. तो गाडी चालक होता. त्याने अनेक मालकांकडे काम केले होते. मात्र आत्महत्येपूर्वी गाडे नामक मालकाच्या गाडीवर ड्रायव्हर होता. या मालकाकडून पैसे उचलण्यासाठी तो प्रत्येकवेळी पद्धतशीररित्या कांगावे सांगत होता. ‘माझी पत्नी गरोदर आहे, तिच्या दवाखान्यासाठी पैसे लागणार आहेत, मला मुलगा आहे, त्याच्यासाठी पैशाची गरज आहे’ प्रत्येक वेळी खोटेनाटे काही तरी सांगून पैसे घेऊन जायचा असे त्याच्या मालकांनी सांगितले. तथापि, त्याचे लग्न झालेले नव्हते, अशी खात्रीशीर माहिती समोर आली आहे



संग्रहित चित्र




पाठलाग बातमीचा...
थेट एमआयडीसी पोलीस ठाण्यातून...

### ‘त्या’ सहाजणांची ८ तारखेला झाली होती मिटिंग; चर्चेतून बदनामी न करण्याबद्दल निघाला होता तोडगा

तीन मित्र आणि तीन मैत्रिणी असे सहाजणांचे वर्तुळ एकमेकांच्या संपर्कात होते. या संबंधितजणांनी ८ ऑगस्टला सोलापुरातील एका ठिकाणी मिटींग झाली होती. यामध्ये दुसऱ्या गर्लफ्रेंडच्या बदनामीचा विषय मिटींगमध्ये मुख्य होता. त्याशिवाय एकूणच समज-गैरसमज त्यातून निर्माण झालेला सहाजणांमधील तणाव या सगळ्याबाबींवर चर्चा झाली होती. बदनामी आणि त्या अनुषंगिक निर्माण झालेलं वातावरण हे सगळं थांबवुया, असंदेखील ठरलं होतं. मात्र ठरलं तसं झालं नव्हतं. ‘तु...तु...मैं...मैं... ही चांगली, ती चांगली नाही...तो चांगला चांगला...ती चांगली...असं होत राहिलं, अशी माहिती समोर आली आहे.

### चौघांना ताब्यात घेऊन कसून चौकशी, एकत्रित पडताळणी केल्यानं अनेक बाबींचा उलगडा

मृत अश्विनी हिने आत्महत्येपूर्वी चिठ्ठी लिहून ठेवली होती. त्यामध्ये मित्र नंबर एक प्रमोद (काल्पनिक नाव) आणि त्याची मैत्रिण हिना (काल्पनिक नाव) यांच्या नावाचा उल्लेख होता. त्यावरुन एमआयडीसी पोलिसांनी या दोघांना पहिल्यांदा ताब्यात घेतलं. त्यानंतर मित्र नंबर दोन विनोद (काल्पनिक नाव) आणि त्याची मैत्रिण विनया (काल्पनिक नाव) या दोघांना ताब्यात घेतलं. चौघांची एकत्र कसून चौकशी केली, यातून अनेक बाबींचा उलगडा झाला.

### मृत रोहित अन् प्रमोद (काल्पनिक नाव) हे जुने मित्र; मात्र सहाजणांच्या नात्याबद्दल सर्वांनाच होती पुरेपूर कल्पना

गळफासातून स्वत:ला कायमचे संपविलेला मृत रोहित ठणकेदार आणि मित्र नंबर एक प्रमोद (काल्पनिक नाव) हे पहिल्यापासूनचे दोस्त होते. प्रमोद आणि मृत अश्विनी या दोघांचे प्रेम तुटल्याची माहिती मृत रोहित याला होती. मात्र दोघांमधील तुटलेले प्रेम जुळवून घेण्यासाठी त्याने दोघांनाही आग्रह केला होता का नाही, याची माहिती समोर आली नाही. रोहित आणि प्रमोद या दोघांच्या मैत्रीनंतर मित्र नंबर दोन विनोद (काल्पनिक नाव) याची मैत्री झाली. विनोद याची मैत्रिण विनया हिच्याबद्दलही या संबंधित सर्वांना माहिती होती. एकमेकांच्या नात्याबद्दल सर्वांनाच पुरेपूर कल्पना होती, अशी माहिती पोलिस तपासातून पुढे आली आहे.

### ‘त्या’ चौघांच्या जबाबातून अंतिम निष्कर्षापर्यंत पोचतील पोलिस

अश्विनी आणि रोहित यांच्या आत्महत्येनंतर शुक्रवारी चौघा मित्र-मैत्रिणींना एमआयडीसी पोलिसांनी ताब्यात घेऊन त्यांच्याकडे घटनेच्या पार्श्वभूमीवर, चौकशी सुरु केली. त्यांचे जबाब नोंदवणे शुक्रवारी रात्री उशिरापर्यंत चालू होते. या संबंधितांच्या जबाबातून अश्विनी आणि रोहित या दोघांनी एकत्र आत्महत्या करण्याचे टोकाचे पाऊल का उचलले? यासंदर्भात अंतिम निष्कर्षापर्यंत पोलिस पोचू शकतात.

## गणेशगाव येथे वृद्ध इसमाची निर्घृण हत्या

✔ अकलूज : माळशिरस तालुक्यातील पूर्व भागातील गणेशगाव येथे ६० वर्षीय वृध्द व्यक्तीचा निर्घृण खून करण्यात आला. ही घटना शुक्रवारी पहाटेच्या सुमारास उडकीस आली. मारेकऱ्यांनी वायमोडे यांचे डोके ठेचून आणि एक हात तोडून त्यांची नियृण हत्या केली आहे. या अमानुष कृत्यामुळे परिसरात संतापाची लाट पसरली आहे. शिन्नपा व्यंकू वायमोडे (वय ६०, रा.गणेशगाव) असे त्या वृद्धाचे नाव आहे.

शिन्नपा व्यंकू वायमोडे यांनी गेल्या अनेक दिवसांपासून त्यांच्या स्वत:च्या घराचे बांधकाम सुरू केले होते. रात्रीच्या वेळी ते या बांधकाम सुरू असलेल्या तेथे एकटेच झोपले होते. सकाळी जेव्हा कुटुंबातील सदस्य त्यांना

### डोके ठेचून आणि एक हात तोडला

खोलीत उठविण्यासाठी गेले. तेव्हा त्यांचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात आढळून आला. हा प्रकार पाहून कुटुंबियांन धक्का बसला. घटनेची माहिती मिळताच अकलूज पोलीस स्टेशनचे पोलीस उपअधीक्षक नारायण शिरगावकर यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन पहाणी केली. तपासाला गती देण्यासाठी श्वानपथकालाही पाचारण करण्यात आले. मृतदेह शवविच्छेदनासाठी अकलूज उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. शवविच्छेदनानंतर मृत्यूचे नेमके कारण आणि इतर तपशील स्पष्ट होईल. या प्रकरणी अकलूज पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

> “या प्रकरणाचा अधिक तपास सुरू असून लवकरच या प्रकरणी सत्य समोर आणले जाईल. मारेकऱ्यांचा शोध घेण्यासाठी सर्व बाजूंनी तपास सुरू आहे.
> -नारायण शिरगावकर, पोलीस उपअधीक्षक, अकलूज

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आरोप–प्रत्यारोप म्हणजे शिळ्या कढीला ऊत!

संगम श्री डे
557-70-460

संगम श्री नाईट
157-30-389

कल्याण
278-72-390

मुंबई
479-09-450

## उजनीची वाटचाल शंभरीकडे...

# आषाढीपूर्वीच पंढपुरात पुराचा धोका! भीमाकाठी सतर्कतेचा इशारा

✔ सोलापूर/विशेष प्रतिनिधी

पुणे शहर आणि जिल्ह्यात पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे शुक्रवारी दौंडमधून पाण्याचा मोठा लोंढा येत असल्याने उजनी धरणातील पाण्याच्या पातळीत झपाट्याने वाढ होत आहे. सायंकाळी सहाच्या अधिकृत माहितीनुसार दौंडमधून धरणात ७२ हजार क्युसेकचा विसर्ग होता. धरणातील पाण्याची पातळी ६८.२० टक्के इतकी झाली होती. येत्या दोन दिवसात उजनी शतक पार करेल, असे सांगण्यात आले.



दरम्यान पुणे जिल्ह्यात अजूनही पावसाची संततधार असल्याने तेथील सर्व धरणे भरली असून तेथून नद्यांमध्ये पाणी सोडले जात आहे. हे सर्व पाणी भीमा नदीतून दौंडमार्गे उजनीत येत आहे. उजनीवरील ताण कमी करण्यासाठी शुक्रवारी सायंकाळपासून ११ हजार ६०० क्युसेकचा विसर्ग भीमा नदीत सोडण्यात आला आहे. त्यामुळे भीमा नदीकाठच्या लोकांना सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे.

उजनी धरणात मिसळणाऱ्या दौंड विसर्गात लक्षणीय वाढ झाली असून ७० हजार क्युसेकपर्यंत वाढल्याने आषाढी वारीचा पार्श्वभूमीवर उजनी धरणाची पाणी पातळी स्थिर ठेवण्यासाठी उजनीतून भीमा नदीत पाणी सोडण्याचा निर्णय धरण व्यवस्थापनाने घेतला आहे.

शुक्रवारी (२० जून) दुपारी ३ वाजता १ हजार ६०० कुसेक तर सायंकाळी ५ वाजता १० हजार क्युसेक असा ११ हजार ६०० क्युसेकचा विसर्ग सोडण्यात आला आहे.

पावसाळा आणखी चार महिने शिल्लक असल्याने पंढरपूर येथे पुढील काळात पूरस्थिती कायम राहणार आहे. दौंड येथील विसर्गात वाढ झाली असली तरी बंडगार्डन येथील विसर्ग सकाळी घटला आहे. बंडगार्डन येथून सकाळी ९ वाजता २४ हजार क्युसेक होता. रात्री ३८ हजार क्युसेकपर्यंत गेला होता. सकाळी त्यात घट झाली आहे. तर खडकवासला धरणातून सोडण्यात येत असलेला विसर्ग कायम असून १५ हजार ९२ क्युसेकचा विसर्ग मुळा मुठा नदीपात्रात सोडण्यात येत आहे.

दरम्यान, यंदा उजनी धरणाच्या इतिहासात पहिल्यांदाच जून महिन्यात उजनी धरणाने शंभरीच्या दिशेने वाटचाल सुरू केल्याने पूर परिस्थिती टाळण्यासाठी प्रशासनाला तातडीने पूर नियंत्रणाच्या दृष्टीने हालचाल करण्याची वेळ आली आहे. उजनी धरणात वेगाने पाणी जमा होऊ लागले आहे.

सध्या पुणे जिल्ह्यातील सर्व धरणांत सरासरी ७० टक्क्यांपर्यंत पाणीसाठा झाला असून यापुढच्या काळात पुणे जिल्ह्यातील धरणांतून पाणी सोडले जाणे अपेक्षित आहे. उर्वरित ३ महिन्यांच्या पाऊस काळात उजनी धरणातून भीमेला पाणी सोडण्याची परिस्थिती निर्माण होणार आहे. मात्र गेल्या दोन वर्षांचा धरण व्यवस्थापनाचा अनुभव पाहता पूरस्थिती टाळण्यासाठी स्ट्रॉंग नियोजनाची गरज आहे. २०१९ आणि २०२० या दोन्ही साली भीमा नदीला पूरस्थिती निर्माण झाली होती.

### तळी, तलाव भरून घेण्यासाठी कालव्यातून पाणी सोडावे

दोन्ही कालव्यातून पाणी सोडून त्या माध्यमातून तळी, तलाव भरून घेण्याची गरज आहे. त्या अनुषंगाने उजनीतील पाणी साठ्यावर ही काही प्रमाणात नियंत्रण राखता येणार आहे. यावर्षी तरी पूर नियंत्रणासाठी योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. यंदाच्या वर्षी धरणे लवकर भरल्याने पूरस्थितीचा धोका अधिक आहे. पूरस्थिती आणि संभाव्य नुकसान टाळण्यासाठी जिल्हाधिकारी, लोकप्रतिनिधी यांनी आतापासूनच लक्ष घालण्याची गरज आहे.